| MHKO140004952023 | नियमित दिवाणी दावा क्र.१०५/२०२३<br>ईराप्पा सिध्दाप्पा निट्टूरकर व इतर.<br>वि<br>मायाण्णा कृष्णा निट्टूरकर व इतर. |
|---|---|

## निशानी क्रमांक १८ वरील आदेश
## (दिनांक ०७/०५/२०२५)

१. प्रस्तुत अर्ज वादी यांनी वादपत्रामध्ये दुरुस्ती होवून मिळणेसाठी दिवाणी प्रक्रिया संहिता **आदेश ६ नियम १७** प्रमाणे दाखल केला आहे.

२. वादी यांनी असे कथन केले आहे की, त्यांनी प्रस्तुत दावा कायम मनाई हुकूम आणि आदेशात्मक मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. दाव्यामध्ये परिच्छेद क्र.१क आणि मनाई अर्ज परिच्छेद क्र.१क मध्ये अनावधानाने टंकलेखनाच्यावेळी तांत्रीक चुक झालेली आहे. त्यामध्ये ग्रामपंचायत मिळकत क्र.६/२ या मजकुराऐवजी ग्रामपंचायत मिळकत नं.६/१ असे लिहीने आवश्यक आहे. तसेच परिच्छेद क्र.२ मध्ये वापत या शब्दाऐवजी वापर हा शब्द लिहीने आवश्यक आहे. परिच्छेद क्र.२ शेवटून पहिल्या ओळीमध्ये वादी व प्रतिवादी या शब्दाऐवजी वादी क्र.१ ते ३ व वादी क्र.४ ते ८ असा मजकुर लिहीने आहे. सदर दुरुस्तीमुळे दाव्याच्या स्वरुपामध्ये बदल होणार नाही. तसेच प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. करिता प्रस्तुत अर्ज.

३. प्रतिवादी यांनी अर्जास म्हणणे दाखल केले आहे आणि अर्जास विरोध दर्शविला आहे. त्यांनी असे कथन केले आहे की, या टप्यावर प्रस्तुत अर्ज चालणे पात्र नाही. वादी यांनी सुचविलेली दुरुस्ती मंजुर होण्यास पात्र नाही. त्यामुळे दाव्याच्या स्वरुपात बदल होणार आहे.

त्यामुळे प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजूर होण्यास पात्र आहे.

४. अभिलेखाचे अवलोकन केले. वादी व प्रतिवादी यांच्या सुविद्य विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला.

५. अभिलेखावरुन असे दिसून येते की, वादी यांनी प्रस्तुत दावा कायम मनाई हुकूम आणि आदेशात्मक मनाई हुकूम मिळणेसाठी दाखल केला आहे. प्रस्तुत प्रकरण निशाणी ५ वर आदेशासाठी प्रलंबित असताना वादी यांनी प्रस्तुत अर्ज दाखल केला आहे. दाव्यामध्ये मुद्दे निश्चित झालेले नाहीत आणि सुनावणी सुरु झालेली नाही. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ प्रमाणे, दाव्यामध्ये सुनावणी सुरु होण्यापूर्वी वादपत्रामध्ये दुरुस्तीसाठी परवानगी देता येते. वादी यांनी वाद पत्रामध्ये ग्रामपंचायत मिळकत नं.६/२ ऐवजी ६/१ असा बदल होवून मिळणेस अशी विनंती केली आहे. सदर दुरुस्ती झाल्यास दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. तसेच प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण दावा मिळकतीवरील कायदेशीर हक्क सादर करण्याची जबाबदारी वादी यांच्यावर आहे.

७. दुरुस्तीचे स्वरूप पाहता, भविष्यातील गुंतागुंत टाळण्यासाठी आणि प्रकरण गुणवत्तेवर निकाली काढण्यासाठी, विनंतीप्रमाणे दुरुस्ती करण्याची परवानगी देणे आवश्यक आहे. अर्ज मंजूर झाल्यास प्रतीवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. तसेच दाव्याचे स्वरुपात बदल होणार नाही. याउलट दावा गुणवत्तेवर निकाली काढणेस मदत होणार आहे. करिता वादीस अर्जातील मागणीप्रमाणे दाव्यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य आहे. त्याचबरोबर वादी यांनी केलेल्या विलंबाबाबत खर्च बसविणे आवश्यक आहे. त्यामुळे अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे. सबब. खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रु.४००/– खर्च बसवून मंजूर करण्यात येत आहे.

२. वादी यांनी वादपत्रामध्ये मुदतीच्या आत पुढील तारखेस अथवा त्यापुर्वी दुरुस्ती करावी.

३. खर्चाची रक्कम वादी यांनी प्रतिवादी यांना द्यावी.

Digitally signed by WAMAN DIGAMBAR JADHAV
Date: 2025.05.08 12:39:57 +0530

**दिनांक ०७/०५/२०२५** **(वामन दि. जाधव)**

**चंदगड** **सह दिवाणी न्यायाधिश, क. स्तर,**

**चंदगड (J.O. Code– MH** 003143)